भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. २७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०१/२०१७

१) शेत जमीनीच्या वादावरुन लोकांच्या समोर अश्लिल शब्दात शिविगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिली . :–

दिनांक ०९/०१/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी शेख इब्राहीन शेख दब्बुनिया वय ६२ वर्ष, रा. डॉ. जाकीर हुसेन वार्ड भंडारा व आरोपी यांचे शेत जमीनीवरुन दिवानी कोर्ट भंडारा येथे प्रकरण सुरु असुन नमुद यातील आरोपीने सार्वजनीक ठिकाणी हजर असतांना इतर लोकासमोर फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

२) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक ०९/०१/२०१७ चे २१.२० वा दर. यातील फिर्यादी परवेज मतीन खान वय २५ वर्ष, रा. अशरफी नगर तकीया वार्ड भंडारा याची बजाज पल्सर काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ४० एबी ५२४३ कि. ७०,०००/–रु. ची घराचे गेट समोर उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दादळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) प्रतिबंधीत क्षेत्रात जाणुन बुजुन वाहन उभे करुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक १०/०१/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील चारचाकी वाहन हे कोणत्याही समाधान कारक सबबी वाचुन प्रथम वर्ग न्यायालय पवनी समोर प्रतिबंधीत क्षेत्रात जाणुन बुजुन वाहन उभे करुन मिळुन आल्याने पोस्टे पवनी येथे कलम १२० मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १०/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०६ तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११२२.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.